क्रमांक एमयुएम/डब्ल्यू-एचई/एचएसजी/टिसी/१६२९६/२१-२२/२०२१/१२५२.— सहायक निबंधक, सहकारी संस्था, एच-पूर्व विभाग मुंबई यांचेकडून मंजूर केलेल्या उपविधीची प्रत व नोंदणी प्रमाणपत्र गोल्डन हाईट्स वाकोला को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., सीटीएस नं. ३७९९-अे, गोल्डन हाईट्स, शिवाजी नगर रोड, वाकोला ब्रिज जवळ, व्हिलेज कोलेकल्याण, सांताक्रूज्ञ (पूर्व), मुंबई ४०० ०५५ नोंदणी क्रमांक एमयुएम/डब्ल्यूएचई/एच.एस.जी./(टिसी)/१६२९६/२०२१-२०२२/२०२१ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्र. २४) यांच्या ९(१) अन्वये नोंदविण्यात आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे करण्यात आले आहे.

व्हि. व्हि. पाटील,

मुंबई, सहायक निबंधक, सहकारी संस्था,

दिनांक १६ डिसेंबर २०२१. एच-पूर्व विभाग, मुंबई.

सहायक निबंधक, सहकारी संस्था, बी विभाग, मुंबई यांजकडून

आदेश

क्रमांक मुंबई/निवडणूक/रिटेलग्रेनडिलर्स/अध्यासी/२८४७/२०२१.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ अअअ (५अ) व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, २०१४ चे नियम ६४ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी सुदाम काठे, प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, बी विभाग, मुंबई, द रिटेल ग्रेन डिलर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड या संस्थेचे खालील नमुद केलेले संचालक त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या मतदार संघातून सन २०२०-२०२१ ते सन २०२५-२०२६ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी यथोचितरित्या गठीत झाल्याचे जाहिर करीत आहे.

अ.क्र.	उमेदवारांचे नाव	पत्ता	मतदारसंघ
(१)	(२)	(३)	(४)
१	श्री. छेडा रमणीकलाल जाधवजी	११०२/आराध्य सिग्नेचर, डॉ.बी.ए.रोड, गांधी मार्केटसमोर, सायन (प.), मुंबई-२२	सर्वसाधारण
२	श्री. देढीया निलेश हरशी	ए-५०२,ॲकोर्ड बिल्डींग, डॉ. चरत सिंग कॉलनी, अंधेरी-कुर्ला रोड, संगम सिनेमाजवळ, अंधेरी पुर्व, मुंबई-९३	सर्वसाधारण
३	श्री. गाला हसमुख भवानजी	२९/३, जमीला बिल्डींग, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३	सर्वसाधारण
४	श्री. सावला खिमजी धारशी	पुनम पार्क, बी/४ विंग,६०२, ६ वा माळा, इंडस्ट्रिल इस्टेट रोड, लालबाग, परेल, मुंबई-१२	सर्वसाधारण
५	श्री. शाह दिनेश जेठालाल	६/७/८, रामनिवास, हनुमान रोड, लुप मोबाईल गॅलरीसमोर, प्लॉट नं.६७, विलेपार्ले पुर्व, मुंबई-५७	सर्वसाधारण
६	श्री. धरोड पियुष तलकशी	ए/७, लक्षलाभ सीएचएस, कार्टर रोड नं. ३, साईधामजवळ, बोरीवेली पुर्व, मुंबई -६६	सर्वसाधारण
७	श्री. शाह/छेडा लक्ष्मीचंद रामजी	न्यु बाडावाला बिल्डींग नं. ६, रुम नं. ३/३५, घोडपदेव रोड, डी. पी. वाडी, घोडपदेव, मुंबई.३३	सर्वसाधारण
८	श्री.विसरीया विपुल विरचंद	डी/८५, दुसरा माळा, छाडवा नगर, मॅच फॅक्टरी-लेन, एच. पी. के. मार्ग, कुर्ला (प), मुंबई-७०	सर्वसाधारण
९	श्री. शाह जयंतीलाल चंपकलाल	६०१, गिरनार बिल्डींग, ६९, ताडदेव रोड, फिल्म सेंटरसमोर, ताडदेव, तुलसीवाडी, मुंबई-३४	सर्वसाधारण
१०	श्री. छेडा राजेश प्रेमजी	रुम नं.१९, २ रा माळा, ४०, पंचाईत वाडी, कबुतर खानाजवळ, भुलेश्वर, काळबादेवी, मुंबई-२	सर्वसाधारण
११	श्री. भेदा रश्मीकांत हिरजी	६/१, अग्रवाल नगर, डॉ. आंबेडकर रोड, फाईव्ह गार्डनजवळ, माटुंगा, मुंबई-१९.	सर्वसाधारण
१२	श्री. छेडा बंसीलाल मोरारजी	प्लॉट नं. २०/४, फ्लॅट नं. ८, पहिला माळा, अग्रवाल भवन, आर. ए. के. रोड, वडाळा (प), मुंबई-३१	सर्वसाधारण
१३	श्री. देढिया कल्याणजी मोनशी	८०१, पार्श्व पदम, ८ वा माळा, ए विंग, मुथालिया रेसीडन्सी, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई-३३	सर्वसाधारण
१४	श्री. गडा जयेश प्रेमजी	२३ वा माळा, ए/२३०२, नाथानी हाईट्स, डॉ. डी. बी. मार्ग, मुंबई सेट्रल स्टेशनसमोर, मुंबई सेंट्रल, मुंबई-८	सर्वसाधारण
१५	श्री. धरोड महेंद्र वसनजी	२४/ए, भाटीया भवन, आईएस शाळासमोर, द. स. बार्बेकर मार्ग, गोखले रोड, दादर प., मुंबई -२८	सर्वसाधारण
१६	श्री. गाला चेतन रामजी	२२/कल्याण बिल्डींग, रुम नं. २४/पहिला माळा, कुंभार तुकडा, के. एम. ज्ञव्हेरी मार्ग, सी. पी. टँक, काळबादेवी, मुंबई-२	सर्वसाधारण

(१)	(२)	(३)	(४)
		महिला राखीव मतदार संघ	
१	श्रीमती गडा रिटा परेश	८/डी, परेरा सोसायटी, एम. व्ही, रोड, नटराज रुस्तमजी टॉवरसमोर, अंधेरी पुर्व, मुंबई-६९	महिला राखीव
२	श्रीमती शाह नेहा आशिष	पार्क अव्हेन्यु सोसायटी, फ्लॅट नं. ५०१ बी, ५ वा माळा, महात्मा फुले क्रॉस रोड, शिवसेना ऑफीसजवळ, विलेपार्ले पुर्व, मुंबई-५७	महिला राखीव
		अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती मतदार संघ	
		रिक्त	
		भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग मतदार संघ	
		रिक्त	
		इतर मागासवर्गीय राखीव मतदार संघ	
		रिक्त	

सदरचा आदेश आज दिनांक १३ डिसेंबर २०२१ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला असे.

सुदाम काठे,
प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी
तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, बी विभाग, मुंबई.

मुंबई,
दिनांक १३ डिसेंबर २०२१.

जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी यांजकडून

आदेश

क्रमांक जिउनि/कृषिपत/का.क. १५६/अधिप्रदान/२०२१/३२४१.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये प्रदत्त शक्तीचा वापर करून मी, डॉ. सोपान शिंदे, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी या आदेशान्वये साईलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, कोतवडे, ता., जि. रत्नागिरी या संस्थेच्या खालील अधिकारी/कर्मचाऱ्यास त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अंतर्गत वसूल प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्जवसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे.

अ. क्र.	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र
१	श्री. विश्वास दिनकर कार्यकर्ते	विशेष वसुली अधिकारी	वसुली अधिकारी	रत्नागिरी तालुका

अटी.—

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्जवसुलीची कार्यवाही करावी. कर्जवसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१/९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी दरमहा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात " अ-३ " " अ-४ " व " ब " कर्जवसुलीची माहिती या कार्यालयास सादर करावी.

४. अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी वसूल केलेल्या संपूर्ण सरचार्ज (लागू असल्यास) रकमेचा भरणा वसूल केलेल्या महिन्यातच चलनाने शासकीय कोषागारात भरणा करावा. वसुली अधिकारी यांनी वसूल केलेला सरचार्ज त्याचा शासकीय कोषागारात केलेला भरणा याबाबत संस्था स्तरावर स्वतंत्र नोंदवही नमुना " अ-१ " " अ-२ " " अ-३ " व " अ-४ " मध्ये ठेवण्यात यावी.

६. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३, दि बेसिन कॅथोलिक को-ऑप.बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेला आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

७. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

८. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

९. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि/किंवा " सिव्हील कोर्ट ", " एक्झ्क्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये) " असे लिहावे.

१०. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " वसुली अधिकारी साईलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, कोतवडे, ता., जि. रत्नागिरी " असा फलक लावता येऊ शकेल.

११. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपाती बाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्जवसूल करण्याची कार्यवाही करावी.

१२. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व सरचार्ज/आदेशिका खर्च रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

१३. संस्थेच्या वसुली अधिकाऱ्याने केलेल्या वसुली कामकाजाबाबत संस्थेचे संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आढावा घेऊन वेळोवेळी या कार्यालयास अहवाल पाठविणे बंधनकारक आहे.

१४. संस्थेने आकारणी केलेल्या आदेशिकेच्या खर्चाची (Cost of process) रक्कमेची तसेच शिल्लक आदेशिकेच्या खर्चाच्या (Cost of process) रक्कमेची माहिती बरोबर असल्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या संचालक मंडळाची व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

१५. वरील अटी शर्तींचे संबंधित संस्था व वसुली अधिकारी यांनी पालन न केल्यास वसुली अधिकारी यांचे अधिकार रद्द करणेचे अधिकार या कार्यालयास राहतील.

डॉ. सोपान शिंदे,
जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २२ डिसेंबर २०२१.

पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांजकडून

मनाई आदेश

क्रमांक वि.शा/ओमायक्रॉन व्हेरीयंट (कोरोना)/मनाई आदेश/२०२१/७२००.— ज्याअर्थी, जगभरात गेल्या काही दिवसांमध्ये सर्वात वेगाने पसरणारा प्रकार म्हणून कोरोना विषाणुचा ओमिक्रॉन व्हेरीयंट समोर आला आहे. हे यु.एस.ए. आणि युरोप मधील अनेक देशांमध्ये प्रबळ असा प्रकार बनला आहे. राज्यात काही दिवसांत एकूण ८८ ओमिक्रॉन कोविड-१९ प्रकरणे नोंदली गेली आहेत. महाराष्ट्र राज्यात मागील एक आठवड्यापासून दररोज १,००० हून अधिक पॉझिटिव्ह कोविड-१९ केसेसची नोंद होत आहे. येत्या काही दिवसांत राज्यभरात लग्नसराई, इतर सण आणि नवीन वर्ष साजरे करण्याच्या पार्श्वभुमीवर नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७, दिनांक १३ मार्च २०२० रोजी पासून लागू करण्यात आला असून त्यातील खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन नोटीफिकेशन क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/आपत्ती व्यवस्थापन-१, दिनांक २४ डिसेंबर २०२१, अन्वये, आदेश लागू केलेला आहे.

ज्याअर्थी, मी, विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालय मला प्रदान करण्यात आलेल्या शासनाच्या क्र.पीआरओ-०९२०/प्रक्र. २१७/विशा-२- फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (सन १९७४ चा २) च्या कलम २१ नुसार प्राप्त विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये संदर्भ क्रमांक ०४ प्रमाणे शासनाने निर्गमित केलेल्या आदेशास अधीन राहून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कोविड-१९ संसर्गास तात्काळ प्रतिबंधक उपाय योजना म्हणून फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) (३) प्रमाणे जनतेस, आस्थापना यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात मनाई आदेश पुर्वलक्षी प्रभावाने दिनांक २५ डिसेंबर २०२१ रोजीचे रात्रौ ००-०१ वा. पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहील.

(१) बंदिस्त जागेच्या ठिकाणी आयोजित विवाह समारंभास जास्तीत जास्त १०० लोक आणि मोकळ्या जागेच्या ठिकाणी २५० लोक किंवा उपस्थिती मर्यादेच्या २५ टक्के यापैकी जी मर्यादा कमी असेल इतकेच लोक उपस्थित राहू शकतील.

(२) सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्यक्रम किंवा मेळाव्यात जेथे सर्वसाधारणपणे नागरिकांची सातत्याने उपस्थिती असेल अशा कार्यक्रमाकरिता बंदीस्त सभागृहात जास्तीत जास्त १०० लोक आणि मोकळ्या जागेच्या ठिकाणी २५० लोक किंवा उपस्थिती क्षमतेच्या २५ टक्के यापैकी जी मर्यादा कमी असेल इतकेच लोक उपस्थित राहू शकतील.

(३) उपरोक्त नमूद कार्यक्रमांव्यतिरीक्त इतर कार्यक्रमांकरिता उपस्थितांची संख्या बंदिस्त सभागृहाच्या ठिकाणी क्षमतेच्या ५० टक्के पेक्षा जास्त नसावी. खुल्या मैदानात क्षमतेच्या २५ टक्के पेक्षा जास्त नसावी.

(४) क्रिडा कार्यक्रम व स्पर्धांकरिता उपस्थित प्रेक्षकांची संख्या त्या ठिकाणच्या आसन क्षमतेच्या २५ टक्के पेक्षा जास्त नसावी.

(५) परवानगी/परवाना प्राधिकरणाने घोषित केल्याप्रमाणे उपहारगृहे, स्पा, चित्रपट व नाट्यगृहे, व्यायामशाळा या आस्थापना ५० टक्के क्षमतेने सुरू राहतील. उपहारगृह मालकांना एकूण आसन क्षमतेविषयी माहिती ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक राहिल.

(६) सार्वजनिक ठिकाणी रात्रौ २१:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो ०५ पेक्षा जास्त इसमांना एकत्र येण्यास मनाई असेल.

सदर मनाई आदेशाबाबत प्रत्येकास स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये, प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस ठाणे, सहा. पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालये यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी दिलेला आहे.

विजयकांत सागर,

मिभाववि पोलीस आयुक्तालय.

पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालय.

पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांजकडून

मनाई आदेश

क्रमांक पो.उप.आ.मुख्या./मनाई आदेश/२०२१/७१९०.— ज्याअर्थी, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्याकडून जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा, अतिक्रमण हटवणे तसेच दिनांक ३१ डिसेंबर २०२१ व १ जानेवारी २०२२ रोजी नवीन वर्षाच्या स्वागताच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

ज्याअर्थी, मी, विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालयाकडील क्रमांक पो.आ.वा./अधि.प्रधान/आदेश/३०/२०२०, दिनांक ९ नोव्हेंबर २०२० अन्वये, मा. पोलीस आयुक्त यांचे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ चे पोट-कलम (१) व (३) चे वापरावयाचे अधिकार आम्हास प्रदान करण्यात आले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मिरारोड, काशिमिरा, नवघर, नयानगर, भाईंदर, उत्तन, वसई, माणिकपुर, अचोळे, वालीव, पेल्हार, नालासोपारा, तुळींज, विरार व अर्नाळा असे एकूण १५ पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे व्हावे.

त्याअर्थी वरील घटनांच्या अनुषंगाने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मी विजयकांत सागर पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) मिरा-भाईंदर, वसई-विरार, महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ चे पोट-कलम (१) व (३) अन्वये जिवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था जोपासण्यासाठी खालीलप्रमाणे मनाई आदेश देत आहे :—

१. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, लाठ्या किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तू बाळगणे.

२. दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जमा करणे.

३. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

४. व्यक्तींच्या किंवा प्रेताकृतीच्या प्रतिमेचे प्रदर्शन करणे.

५. सार्वजनिक रितीने घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजवणे.

६. सभ्यता अगर निती या विरुद्ध असतील अशी किंवा राज्यातील शांतता धोक्यात आणतील किंवा ज्यामुळे राज्य शासन उलथून पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक प्रदर्शित करणे.

७. पाच किंवा पाचपेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इत्यादी कृत्यांना या आदेशान्वये मनाई करीत आहे.

वरील मनाई आदेश खालील व्यक्तींना लागू राहणार नाही.

" जो कोणी इसम सरकारी नोकर आहे किंवा ज्यास वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्र घेणे भाग पडेल किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने सूट दिलेली आहे. "

सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागू राहणार नाहीत.

१. लग्न कार्यासाठी जमलेले लोक.

२. प्रेतयात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका.

३. सरकारी/निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेरी येथे जमलेले लोक.

४. सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला समुदाय.

५. पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या सभा/मिरवणुका.

६. सर्व शासकीय/निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडत असलेली ठिकाणे.

सदर मनाई आदेश दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजी चे ००-०१ वाजेपासून ते दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजीचे २४-०० वाजेपर्यंत अंमलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

विजयकांत सागर,
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालय.

मिभाववि पोलीस आयुक्तालय,
दिनांक २८ डिसेंबर २०२१.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

कार्यालयीन आदेश

क्रमांक आस्था बी-२/५७७३/२०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक (६) मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे.

अ. क्र.	न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/ परिवर्तीत रजा	अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्रीमती एस. एस. मतकर, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी, वर्ग-१, रत्नागिरी.	६९ दिवस अर्जित रजा.	दिनांक २० डिसेंबर २०२१ ते दिनांक २९ डिसेंबर २०२१ या दहा दिवसांची अर्जित रजा.	दिनांक १९ डिसेंबर २०२१ ची सुट्टी दिनांक १८ डिसेंबर २०२१ चे कार्या. वेळेनंतरपासून ते दिनांक ३० डिसेंबर २०२१ चे कार्या. वेळेपूर्वीपर्यंत.	श्रीमती आर. एस. गोसावी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी, वर्ग-१, रत्नागिरी.

रजेवरुन परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरील प्रमाणे रजेच्या कालावधीत त्याचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत येत आहे. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबंधी त्यांचे न्यायालयाशी संलग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना द्याव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

रत्नागिरी,
दिनांक १८ डिसेंबर २०२१.

एम. क्यु. एस. एम. शेख,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

कार्यालयीन आदेश

क्रमांक आस्था बी-२/५८०२/२०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक (६) मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे.

अ. क्र.	न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम	शिल्लक अर्जित/ परिवर्तीत रजा	अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक	रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत)	अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	श्रीमती बी. ए. दुर्गवडे, दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी, वर्ग-१, गुहागर.	९० दिवस अर्जित रजा.	दिनांक २० डिसेंबर २०२१ ते दिनांक २२ डिसेंबर २०२१ पर्यंत ३ दिवस अर्जित रजा.	दिनांक २० डिसेंबर २०२१ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपासून ते दिनांक २३ डिसेंबर २०२१ चे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत.	श्रीमती जे. जे. माने, दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी, वर्ग-१, चिपळूण.

रजेवरुन परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुर्नर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरील प्रमाणे रजेच्या कालावधीत त्याचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत येत आहे. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

संबंधित न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबंधी त्यांचे न्यायालयाशी संलग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना द्याव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

रत्नागिरी,
दिनांक २० डिसेंबर २०२१.

एम. क्यु. एस. एम. शेख,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS JUDGE, SINDHUDURG

Office Order

No. Admn./2907/2021.— Shri A. M. Phadatare, Chief Judicial Magistrate, Sindhudurg, is granted commuted leave *ex-post-facto*, for 03 days from 07/12/2021 to 09/12/2021.

No locum tenens is necessary.

On return from leave Shri A. M. Phadatare is reposted as Chief Judicial Magistrate, Sindhudurg.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S.(Pay) Rule 1981, Shri A. M. Phadatare, would have been continued to an officiate as Chief Judicial Magistrate, Sindhudurg had he not proceeded on leave as above.

During the abovesaid leave period, the administrative charge of the Court of the Chief Judicial Magistrate, Sindhudurg was already kept with Smt. A. B. Kurane, Civil Judge (S.D.), Sindhudurg at Oros and the charge of the remand work & urgent criminal matters of the Court of the Chief Judicial Magistrate, Sindhudurg was already kept with Smt. A. J. Bachulkar, Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Kudal.

The Chief Judicial Magistrate, Sindhudurg is directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officer concerned.

S. V. HANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg.

Sindhudurg,
dated the 10th December 2021.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./६२४१/२०२१.— श्रीमती पी. एस. जी. चाळकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क, स्तर, अलिबाग यांची दिनांक २० डिसेंबर २०२१ ते २४ डिसेंबर २०२१ अशी ०५ दिवसांची अर्जित रजा मागील रविवार दिनांक १९ डिसेंबर २०२१, व पुढील चौथा शनिवार दिनांक २५ डिसेंबर २०२१ व रविवार, दिनांक २६ डिसेंबर २०२१ रोजीस जोडून, दिनांक १८ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. नंतर ते दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. पुर्वीपर्यत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती. पी. एस. जी. चाळकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अलिबाग, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अलिबाग येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती. पी. एस. जी. चाळकर, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अलिबाग हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

दिनांक १८ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. नंतर ते दि. २२ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. पूर्वीपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती एस. व्ही. घारगे, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अलिबाग यांजकडे राहील.

दिनांक २२ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. पासून ते दि. २३ डिसेंबर २०२१ रोजीची का. वे. संपेपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती ए. व्ही. मोहिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क, स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अलिबाग यांजकडे राहील.

दिनांक २३ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. नंतर पासून ते दि. २७ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. पूर्वीपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती एस. एस. पिंगळे, मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक १७ डिसेंबर २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./६२१२/२०२१.— श्रीमती अ. अ. गोडसे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल यांची दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ ते १३ नोव्हेंबर २०२१ रोजीची ०३ दिवसांची परावर्तित रजा पुढील दिनांक १४ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या रविवारच्या सुटटीला जोडून पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती अ. अ. गोडसे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व स्तर, पनवेल म्हणून पुर्नर्नियुक्ती करण्यांत येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती अ. अ. गोडसे हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते, तर ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व स्तर, पनवेल या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्रीमती अ. अ. गोडसे हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार जिल्हा न्यायालय स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक १५ डिसेंबर २०२१.

प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./६२६७/२०२१.— श्री. आर. एस. भाकरे, तद्‌र्थ जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल यांची दिनांक २० डिसेंबर २०२१ ते दिनांक २४ डिसेंबर २०२१ अशी ५ दिवसांची अर्जित रजा, मागील दिनांक १९ डिसेंबर २०२१ रोजीचा रविवार तसेच दिनांक २५ डिसेंबर २०२१ रोजीच्या नाताळच्या व दिनांक २६ डिसेंबर २०२१ रोजीच्या रविवारच्या सुट्टीस जोडून दिनांक १८ डिसेंबर २०२१ का. वे. नंतर पासून ते दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. पू. पर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. आर. एस. भाकरे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची तद्‌र्थ जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल येथे पुनर्नियुक्ती करण्यांत येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. आर. एस. भाकरे, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. आर. एस. भाकरे, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरीत करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

दिनांक १८ डिसेंबर २०२१ का. वे. नंतर ते दिनांक २१ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. पर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती एम. ए. आनंद, जिल्हा न्यायाधीश-२, पनवेल यांजकडे राहील.

दिनांक २१ डिसेंबर २०२१ का. वे. नंतर पासून ते २४ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. पूर्वीपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. आर. जी. अस्मर, जिल्हा न्यायाधीश-१, पनवेल यांजकडे राहील.

दिनांक २४ डिसेंबर २०२१ का. वे. पूर्वीपासून ते २७ डिसेंबर २०२१ रोजीच्या का. वे. पूर्वीपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. अ. य. थत्ते, जिल्हा न्यायाधीश-२, रायगड-अलिबाग यांजकडे राहील.

अशोककुमार बी. भिल्लारे,
प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक १८ डिसेंबर २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./६४१५/२०२१.— श्री. अशोककुमार बी. भिल्लारे, जिल्हा न्यायाधीश-१, रायगड-अलिबाग यांची दिनांक १६ डिसेंबर २०२१ ची १ दिवसांची अर्जित रजा विशेष बाब म्हणून मुख्यालय सोडणेच्या परवानगीसह पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. अशोककुमार बी. भिल्लारे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची जिल्हा न्यायाधीश-१, रायगड-अलिबाग येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. अशोककुमार बी. भिल्लारे, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर जिल्हा न्यायाधीश-१, रायगड-अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. अशोककुमार बी. भिल्लारे, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरीत करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. ए. वाय. थत्ते, जिल्हा न्यायाधीश-२, रायगड-अलिबाग यांजकडे राहील.

वि. प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक २३ डिसेंबर २०२१.

प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./६४१३/२०२१.— श्रीमती पी. एन. पठाडे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर उरण, यांचा दिनांक १७ डिसेंबर २०२१ व १८ डिसेंबर २०२१ अशी दोन दिवसांची अर्जित रजा दिनांक ९ डिसेंबर २०२१ ते दिनांक १६ डिसेंबर २०२१ रोजीचे अर्जित रजेस जोडून व पूढील दिनांक १९ डिसेंबर २०२१ रोजीचे रविवारच्या सुट्टीस जोडून मुख्यालय सोडणेच्या परवानगीसह मिळणेचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती पी. एन. पठाडे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती पी. एन. पठाडे, ह्या जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या, तर २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिल्या असत्या.

श्रीमती पी. एन. पठाडे, ह्या रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरीत करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. आर. बी. पोळ, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर उरण यांजकडे राहील.

अशोककुमार बी. भिल्लारे,
प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक २२ डिसेंबर २०२१.

प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./६४१२/२०२१.— श्री. आर. जी. मलशेट्टी, जिल्हा न्यायाधीश-३, रायगड-अलिबाग यांची १९ डिसेंबर २०२१ व दि. २० डिसेंबर २०२१ अशी एकूण २ दिवसांची अर्जित रजा दिनांक १३ डिसेंबर २०२१ ते दिनांक १८ डिसेंबर २०२१ रोजीचे अर्जित रजेस जोडून दिनांक २१ डिसेंबर २०२१ रोजीचे का.वे.पूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. आर. जी. मलशेट्टी, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची जिल्हा न्यायाधीश-३, रायगड-अलिबाग येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. आर. जी. मलशेट्टी, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर जिल्हा न्यायाधीश-३, रायगड-अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. आर. जी. मलशेट्टी, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरीत करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

दिनांक १९ डिसेंबर २०२१ ते दिनांक २१ डिसेंबर २०२१ का वे.पू.पर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. जे. जे. मोहिते, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, रायगड-अलिबाग यांजकडे राहील.

अशोककुमार बी. भिल्लारे,
प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक २२ डिसेंबर २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./६४१७/२०२१.— श्रीमती. ए.व्ही.मोहिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, अलिबाग यांची दिनांक १६ डिसेंबर २०२१ व दिनांक १७ डिसेंबर २०२१ अशी ०२ दिवसांची परावर्तीत रजा पुर्वलक्षी प्रभावाने मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती ए. व्ही. मोहिते, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, अलिबाग म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती ए. व्ही. मोहिते, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्रीमती ए. व्ही. मोहिते, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीतील त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती पी. एस. जी. चाळकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, अलिबाग यांजकडे राहील.

वि. प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक २३ डिसेंबर २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./६४१६/२०२१.— श्री. टी. एम. जहागीरदार, अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, माणगांव यांची दिनांक २७ डिसेंबर २०२१ ते दिनांक ०१ जानेवारी २०२२ रोजीची सहा दिवसाची अर्जित रजा, मागील दिनांक २५ डिसेंबर २०२१ रोजीचा चौथा शनिवार व दिनांक २६ डिसेंबर २०२१ रोजीचा रविवार व पुढील दिनांक २ जानेवारी २०२२ रोजीच्या रविवारच्या सुट्टीस जोडून दिनांक २४ डिसेंबर २०२१ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतर पासून ते दिनांक ०३ जानेवारी २०२२ रोजीच्या कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्याची व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. टी. एम. जहागीरदार, यांचा रजेचा कालावधी संपल्यावर त्यांची अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, माणगांव म्हणून पुनर्नियुक्ती करण्यांत येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ६५ (१) नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. टी. एम. जहागीरदार, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, माणगांव या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. टी. एम. जहागीरदार, अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्यांच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक २३ डिसेंबर २०२१.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

अधिसूचना

क्रमांक रा.अ./६४१८/२०२१.— श्री. अ. य. थत्ते, जिल्हा न्यायाधीश-२, रायगड-अलिबाग यांची दिनांक ०३ डिसेंबर २०२१ ते १० डिसेंबर २०२१ अशी एकूण ०८ दिवसांची परावर्तित रजा, पुढील शनिवार दिनांक ११ डिसेंबर २०२१ व रविवार दिनांक १२ डिसेंबर २०२१ रोजीचे सुट्टीस जोडून मुख्यालय सोडणेचे परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. अ. य. थत्ते, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची जिल्हा न्यायाधीश-२, रायगड-अलिबाग येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. अ. य. थत्ते, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर जिल्हा न्यायाधीश–२, रायगड-अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. अ. य. थत्ते, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार न्यायालय स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

विभा प्र. इंगळे,
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक २३ डिसेंबर २०२१.

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक जि/भूसं/मुंश./प्र.क्र.५/एलएक्यू/एसआर/२०२१/भूकर क्र. ६७१ धारावी विभाग.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक- जि/भूसं/मु.श/प्र.क्र.५/एलएक्यू/एसआर-२०२०/भूकर क्र. ६७१ धारावी विभाग, दिनांक १९ जानेवारी २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली असून ती अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग एक (को.वि.पु.)-१, दिनांक गुरुवार ते बुधवार जानेवारी २८-फेब्रुवारी ३, २०२१ रोजीचे पृष्ठ क्रमांक २० ते २३ वर प्रसिद्ध झाली आहे. तसेच मराठी दैनिक वृत्तपत्र " सामना " यामध्ये दिनांक २२ जानेवारी २०२१ व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र " फ्री प्रेस जर्नल " यामध्ये दिनांक २० जानेवारी २०२१ रोजी प्रसिद्ध झाली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी मुंबई शहर यांची, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी आदेश क्र. उ.जि./भू.सं./मुं.श./सीएसटी कुर्ला/१७/२०२१, दिनांक ११ जानेवारी २०२१ अन्वये उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर यांस पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची - एक

जमिनीचे वर्णन

मौजे-धारावी, जिल्हा मुंबई

अ.क्र.	भुकर क्रमांक	संपादनाखालील जमिनीचे क्षेत्र चौ.मी.
(१)	(२)	(३)
१	६७१	२००३.०० चौ.मी.

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	महाराष्ट्र नागरी वाहतूक प्रकल्प
(१)	(२)
प्रकल्पाच्या कामाचे वर्णन	मुंबई सी.एस.एम.टी. ते कुर्ला रेल्वे प्रवासी वाहतुकीसाठी (५ वी व ६ वी लाईन)

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत वर्णन

अ.क्र.	तपशील
(१)	(२)
१	संपादन संस्था मध्य रेल्वे मुंबई, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता तयार करण्यात आलेल्या धोरणानुसार पुनर्वसन करणार आहेत व त्याकरिता या संपादनाखालील क्षेत्रावरील झोपडपट्टी असल्याने मे. स्पार्क या स्वयंसेवी संस्थेमार्फत सर्वेक्षण करून प्रमाणित पात्रता यादीनुसार पात्र रहिवासी/भाडेकरू/गाळेधारक यांचे कायमस्वरूपी पुनर्वसन किलबर्न नाहूर ठिकाणी करण्यात येईल असे मध्य रेल्वे मुंबई, त्यांचेकडील क्र. DR/DRG/5th & 6th lines/CSMT-CLA/Land, दिनांक २७/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर पत्रासोबत सादर करण्यात आलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, यांचेकडील क्र. सा.वि.क./मुंनापप्र-२ बी/६ वी लाईन/CSMT/२०२१, दिनांक २३/०८/२०२१ अन्वये, निवासी झोपड्याच्या बदली, निवासी २२५/२६९ चौ. फुटाची सदनिका वितरित करण्यात येणार आहे. तसेच अनिवासी झोपड्याच्या एकूण ७५० चौ.फूट क्षेत्रफळापैकी २२५ चौ.फूट निःशुल्क व उर्वरित क्षेत्रफळाची अनिवासी सदनिका चालू वर्षाच्या रेडीरेकनर दराने शुल्क आकारून वितरित करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त सामाजिक सुविधा म्हणून बालवाडी, सोसायटी ऑफिस व वेल्फेअर सेंटर देणे अनुज्ञेय असल्याबाबत नमूद आहे.

अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

धारावी विभाग येथील भूकर क्र. ६७१ क्षेत्रफळ २००३.०० चौ.मी. मुंबई सी.एस.एम.टी. ते कुर्ला रेल्वे प्रवासी वाहतुकीसाठी (५ वी व ६ वी लाईन) या प्रकल्पाच्या प्रयोजनासाठी संपादन होत आहे.

तथापि भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या तरतुदीला अधीन राहून मध्य रेल्वे मुंबई व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून अनुसूची-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे झोपडीधारकांचे पुनर्वसन करणार आहेत.

टीप.— उक्त जमिनीच्या नकाशांचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर, पहिला माळा, डी.डी. बिल्डिंग, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई ४०० ००१ व उप मुख्य अभियंता (सी), दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पूर्व), मध्य रेल्वे मुंबई ४०० ०१४ या कार्यालयात निरीक्षण करता येऊ शकेल.

मुंबई शहर,
दिनांक ३१ डिसेंबर २०२१.

राजीव निवतकर,
जिल्हाधिकारी, मुंबई शहर.

BY THE COLLECTOR OF MUMBAI CITY DISTRICT

NOTIFICATION

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. C/ACQ/Mum.city/CR.5/LAQ/SR/2021 C.S.No.671 Dharavi Division.— Whereas, the Collector of Mumbai City being an appropriate Government has, *vide* Notification, No.C/ACQ/Mum.city/CR.5/LAQ/SR/2020 C.S.No. 671 Dharavi Division, dated 19th January 2021 (hereinafter referred to as the "said Notification") issued a Preliminary Notification in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 11 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) (hereinafter referred to as the "said Act") and published in *Maharashtra Government Gazette* dated 28th January-3rd February 2021 (K.D.S.)-1 on page No. 20 to 23 (hereinafter referred to as the "said Notification") and published in daily Marathi News paper "Samana" on 22nd January 2021 and English News paper "The Free Press Journal" on 20th January 2021 and thereby notified that the land more particularly described in Schedule I appended hereto is required or likely to be required for a public purpose more particularly specified in Schedule II ;

And Whereas, the Collector of Mumbai City is satisfied, that the said land is needed to be acquired for the said public purpose; and therefore, it is hereby declared under the provision of sub-section (*1*) of section 19 of the said Act, that the said land is needed for the said public purpose ;

And Whereas, it is hereby declared that an area more particularly described in Schedule III is identified as the "resettlement area" for the purpose of rehabilitation and resettlement of the affected families; and a summary of the rehabilitation and resettlement scheme is specified in Schedule IV.

And Whereas, under clause (g) of section 3 of the said Act, the Collector being the appropriate Government is pleased to designate Deputy Collector (Land Acquisition) Mumbai City by Order No.D.C./acq/Mum.city/CST-Kurla/17/2021, dated 11th January 2021 to perform the functions of a Collector under clause (g) of section 3 the said Act.

Schedule - I

Description of Land

Division - Dharavi District - Mumbai City

Sr. No. (1)	C. S. No. (2)	Area in Sq. Mtrs. (3)
1	671	2003.00

Schedule - II

Particulars of the nature of public purpose

Name of the project (1)	Mumbai Urban Transport Project (2)
Particulars of Project	Acquisition for the purpose of CSMT-Kurla Rail Passengers Transportation (5th and 6th Line)

Schedule - III

Description of Re-settlement Area

Sr. No. (1)	Details (2)
1	The Acquiring body Central Railway, Mumbai will rehabilitate the affected persons under the policy framed for Rehabilitation. The Central Railway, Mumbai by its letter no. DR/DRG/5th & 6th lines/CSMT-CLA/Land dated 27/08/2021 stated that, if there is slum on the land under the project, the NGO M/S SPARC will conduct a survey and prepare the certified eligibility list. The residents/tenants/hutment dwellers eligible under this list, shall be rehabilitated permanently at Kilburn, Nahur. The Central Railway Mumbai Stated that according to the Mumbai Metropolitan Region Development Authority letter No. सा.वि.क./मुंनापप्र-२ बी/६ वी लाईन/ CSMT/2021, dated 23/08/2021, residential flat of 225/269 sq. ft. area will be allotted instead of residential hutment. And for non-residential hutment 225 sq. ft. area out of total 750 sq. ft. will be allotted free of cost and remaining non-residential area will be allotted by charging on it, as per ready reckoner rate of current year. Besides this, it is mentioned that nursery, society office, welfare centre will be permissible as social amenity.

Schedule - IV

(Summary of the rehabilitation and resettlement scheme)

The land of C.S.No. 671 of Dharavi Division, admeasuring area 2003.00 sq.mtr. is being acquired for the purpose of CSMT-Kurla (5th and 6th Line) Rail Passengers Transportation Project.

However, as per the provisions of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013, the Central Railway Mumbai and Mumbai Metropolitan Region Development Authority will rehabilitate the hutment dwellers as mentioned in the Scheduled-III.

N.B.— A plan of the said land can be inspected at the office of Deputy Collector (Land Acquisition) Mumbai City, 1st Floor, DD Building, Old Custom House, Fort, Mumbai 400 001 & Dy. Chief Engineer (C), Dadasaheb Phalke Road, Dadar (E), Mumbai 400 014.

Mumbai City,
Dated 31st December 2021.

RAJEEV NIVATKAR,
Collector, Mumbai City.

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

